लोकमत महामॅरेथॉनसाठी चीन आणि तैवान येथील धावपटूंचीही तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉन स्पर्धा जसजशी जवळ येत आहे तसतसा धावपटूंमध्ये नवा उत्साह संचारत आहे. तीन आठवड्यांवर आलेल्या या स्पर्धेची 'क्रेझ' एवढी आहे की, केवळ स्थानिक धावपटूंनाच नाही, तर परदेशी पाहुण्यांनादेखील महामॅरेथॉनचे वेध लागले आहेत. सध्या शहरात वास्तव्यास असलेल्या दोन चिनी व एक तैवानी धावपटूंनी नुकताच स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी केली.

चीनचे जिआंजून वेई (५०) व वँग्यान पेंग (४५) आणि तैवानचे चाओचीन हुआंग (३२) अशी त्यांची नावे आहेत. हे तिघे विदेशी पाहुणे शहरातील एका कंपनीमध्ये कार्यरत आहेत.

वँग्यान पेंग

चाओचीन हुआंग

जिआंजून वेई

लोकमत औरंगाबाद महामॅरेथॉनची उत्साहपूर्ण चर्चा ऐकून त्यांना यामध्ये सहभागी होण्याचा मोह आवरला नाही. हजारोंच्या संख्येने लोक एकत्र धावणार म्हटल्यावर जोश आणि जल्लोष काही निराळाच असणार यात काही शंका नाही.

'लोकमत'शी बोलताना चाओचीन हुआंग म्हणाले की, 'लोकमत महामॅरेथॉनसारख्या भव्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मी खूप उत्साहित आहे. मला विश्वास आहे की, आम्हा सगळ्यांना खूप मजा येणार आहे.' जिआंजुन आणि वँग्यान यांनीही हुआंगप्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त केली.

ते म्हणाले, 'आता आम्हाला १७ डिसेंबरची प्रतीक्षा आहे. त्या दिवशी आम्ही अत्यंत मनमोकळेपणाने स्पर्धेचा आनंद लुटणार आहोत.

यानिमित्त नवे मित्रही जोडले जातील. वेगाने किंवा हळू धावू; पण आम्ही स्पर्धा पूर्ण करणार. आयुष्यभर स्मरणात राहील, असा हा दिवस ठरेल, अशी आशा आहे.'

Avail Free Training*
READY FOR Wi-Fi SHARING.
READY WITH
Canon
Delighting You Always
EOS 1300D
EOS 80D
EOS 1300D Double Zoom kit
MRP : ₹ 41 695.00/U*
(incl., of all taxes)
FREE* 16GB SDHC CARD + CARRY CASE
EOS 80D Range Starts from
MRP : ₹ 83 995.00/U*
(incl., of all taxes)
FREE* 8GB SDHC CARD
CANON IMAGE SQUARE : SHOP NO. B-6, SAMYAK ARCADE, CANNAUGHT PLACE, CIDCO, AURANGABAD. PH.: 2483971, 2489971
*T&C: Offer available for a limited period or till stocks last. All prices mentioned are MRP (inclusive of all taxes). Models, prices & specifications are subject to change without prior notification. Product images are shown for illustration purpose only. Actual product may vary from images shown. #Conditions apply.
Finance Available*
welworth

अन्न व औषध प्रशासनातर्फेही शहरवासीयांना आवाहन

उद्दिष्टप्राप्तीची मानसिकता तयार करण्याचे महामॅरेथॉन सशक्त माध्यम

चं.भा.पवार
सहआयुक्त अन्न व औषध प्रशासन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमतच्या वतीने आयोजित महामॅरेथॉन ही नुसती धावण्याची स्पर्धा नव्हे, तर यातून उद्दिष्टप्राप्तीसाठीची मानसिकता तयार करण्याचे एक सशक्त माध्यम बनत आहे. मागील वर्षी या स्पर्धेला शहरवासीयांचा उत्तम प्रतिसाद लाभला होता. यंदा शहरात निर्माण झालेले सकारात्मक वातावरण पाहता मागील वर्षीचा सहभागी होणाऱ्यांचा विक्रम यावेळेस मोडला जाईल, यात शंकाच नाही.

महामॅरेथॉन स्पर्धेचा शहराला काय फायदा होईल?

एरव्ही अनेकजण पहाटेच्या वेळी मैदानात, बागेत किंवा रस्त्यावरून चालत असतात, धावत असतात; पण ते वैयक्तिकरीत्या असते. महामॅरेथॉनमध्ये असंख्य लोक एकाच उद्दिष्टप्राप्तीसाठी सोबत धावत असतात. यातून सामूहिक भावना निर्माण होते. एकता, एकात्मता साधण्यासाठी ही सामूहिक भावनाच महत्त्वपूर्ण ठरते. पूर्वी महामॅरेथॉन स्पर्धा मुंबई, दिल्ली, बंगलोरसारख्या महानगरातच होत असे, मात्र लोकमतने आता औरंगाबादेत राष्ट्रीयस्तरावरील महामॅरेथॉनचे त्याच स्थरावर जाऊन आयोजन करीत आहे. यामुळे 'औरंगाबाद महामॅरेथॉन' ला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. शहरातील प्रत्येकाला यात सहभागी होता येते. एवढेच नव्हे तर ३ कि.मी.च्या महामॅरेथॉनमध्ये, तर सहपरिवार सहभागी होऊ शकतात.

सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना काय सल्ला द्याल?

उदयोन्मुख धावपटूंसाठी महामॅरेथॉनचे शहरात आयोजन ही सुवर्णसंधीच आहे. २१ कि.मी.च्या या हाफमॅरेथॉनमुळे आपल्यातील धावण्याची क्षमता, शारीरिक क्षमता लक्षात येते. उणिवा दूर करून भविष्यात या धावपटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होता येते. तसेच सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने धावण्याची सवय याच माध्यमातून लागते. आपणास पुढील वर्षी निर्धारित लक्ष गाठायचे आहे. यासाठी ते वर्षभर धावण्याचा सराव करीत असतात.

मॅरेथॉन झाल्यावर दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात मोठे छायाचित्र येतात त्यामुळेही अनेकांना चालणे व धावण्याची प्रेरणा मिळते. तसेच मधुमेहींचे वाढते प्रमाण लक्षात घेता आता सर्वांनाच पहाटे चालण्याचा, धावण्याचा सराव करणे अतिआवश्यक झाले आहे.

महामॅरेथॉन स्पर्धेत आपण सहभागी होणार का?

खाद्यपदार्थातील भेसळ शोधून ते विक्री करणाऱ्यांवर कारवाई करणे व भेसळयुक्त खाद्यपदार्थांना प्रतिबंधित करणे व नागरिकांना दर्जेदार अन्नपदार्थ मिळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन सदैव प्रयत्न करीत असते. निरोगी आरोग्य राखण्यासाठी त्याचा प्रचारासाठी अन्न व औषध विभाग या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहे. शहरवासीयांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. ज्यांना धावण्याची सवय आहे. त्यांना महामॅरेथॉनमध्ये धावणे सोपे आहे; पण जे कधीच धावत नाही त्यांनी आधी प्रॅक्टिस करणे आवश्यक आहे. महामॅरेथॉनमुळे आरोग्याविषयी शहरवासी जागरुक झाले आहेत. याची प्रचीती पहाटेच्या वेळेस पाहण्यास मिळते, अशा स्पर्धेमुळेच जागरुकता निर्माण होते, अशा उपक्रमांत सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांनीही सहभागी व्हावे. एवढेच नव्हे तर नियमित चालणे व धावण्याचा सराव केला, तर तणावमुक्त जीवन जगता येईल.

महापरिनिर्वाण दिन: ५ डिसेंबरला विशेष रेल्वे

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ५ डिसेंबर रोजी आदिलाबाद-नांदेड-दादर विशेष रेल्वे सोडण्यात येत आहे. ही रेल्वे ५ डिसेंबरला आदिलाबाद येथून सकाळी ७ वाजता सुटेल. नांदेड येथून सकाळी ११ वाजता, परभणी येथून दुपारी १२.३० वाजता, जालना येथून दुपारी ३.३२, तर औरंगाबाद येथून दुपारी ४.५० वाजता सुटेल. ही रेल्वे मनमाडमार्गे दादर (मुंबई) येथे ६ डिसेंबर रोजी पहाटे ३ वाजता पोहोचेल. परतीच्या प्रवासात ही रेल्वे ७ डिसेंबर रोजी रात्री १२.५० वाजता सुटेल आणि मनमाड, नांदेडमार्गे आदिलाबाद येथे पोहोचेल, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातर्फे देण्यात आली.

'ऑरा औरंगाबाद' मध्ये उद्या कथ्थक

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'महागामी'तर्फे आयोजित 'ऑरा औरंगाबाद' या महोत्सवांतर्गत शनिवारी (दि.२) आणि रविवारी (दि.३) कथ्थक नृत्य सादरीकरण होणार आहे. महागामीच्या केंद्रात सायंकाळी ७.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात शनिवारी संस्थेच्या शिष्या सरस्वती वंदना, जानसमोहिनी तराणा, ताल झपताल, सावरा गिरीधर आणि किरवाणी तराणा आदींवर आधारित रचनांवर सादरीकरण होणार आहे. रविवारी मुंबई येथील कलावंत निशा चांदवाणी शिवस्तुती, नृत्य पक्ष, अभिनय पक्ष आणि अष्टपदी केंद्रित कथ्थक प्रस्तुती मंचित करतील, अशी माहिती संचालिका पार्वती दत्ता यांनी दिली.

हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

जेएमके इन्फोसॉफ्ट सोल्युशन ग्रुप

यंग रनर ग्रुप : (डावीकडून) देशराज डेबरा, श्रीपाद सरदेशपांडे, ओम सरदेशपांडे, आर्यन सरदेशपांडे, गिरीश तोलवानी, अनिल माणिक शेट्टी, राजेंद्र डोसी, गोपाल डबीर, दयानंद कांबळे, मोहनीष थोरात, भरत शहा, राकेश जाधव, आदर्श जाधव, व्यंकटेश काटकर.

पोस्टमास्टर जनरल ऑफिस ग्रुप- (डावीकडून) स्वप्नील तुपशेंद्रे, विवेक धावले, संजय मुत्याल, सदाशिव तुपे, शेख असदउल्ला, बळीराम शेळके, स्वप्नील पवार, प्रभाकर तिवरखेडे, निवृत्ती तोडकर, संदीप रेपे, गणेश खाडे, सचिन टेहरे, प्रवीण झोंड.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

करमाड येथे आज शेतकरी मेळावा

औरंगाबाद : संभाजी सेनेच्या वतीने (दि.१) शुक्रवारी करमाड येथे शेतकरी मेळावा आयोजित केला आहे. यावेळी कार्याध्यक्ष रविकुमार सोडतकर, संघटक सखाराम काळे पाटील, सुधाकर माने,रामेश्वर शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे, असे जिल्हाध्यक्ष प्रभाकर भुसारे यांनी कळविले आहे.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

लोकमत | लोकमत WINTER DHAMAKA (बक्षीस योजना प्रवेशिका) योजना कालावधी : १ डिसेंबर २०१७ ते ११ मार्च २०१८

मास्टर कूपन	मास्टर कूपन	मास्टर कूपन	मास्टर कूपन	मास्टर कूपन					

स्पर्धकाचे संपूर्ण नाव : .....

पत्ता : .....

.....

मोबा.नं : | | | | | | | | | | |

.....
स्पर्धकाची सही

- योजनेत एकूण १०० कूपन्स (९० रेग्युलर + १० मास्टर कूपन) प्रकाशित होतील. त्यापैकी एकूण ७० रेग्युलर व ५ मास्टर कूपन असे एकूण ७५ वरील प्रवेशिकेत चिकटवावेत.

*टीप : नियम व अटी लागू